ठाणे वनवृत्ताअंतर्गत रोहा वनविभागातील मुरुड वनक्षेत्रातील, मांडला, कोर्लई, काशिद, मजगांव या संयुक्त वनव्यवस्थापन मार्फत आपटा बीज भांडवल बाबतच्या कामाकरीता निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. आपटा-२०१७/प्र.क्र.११८/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २० मार्च, २०१८

<u>वाचा</u> :- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ०६ फेब्रुवारी,२०१८

२) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.आपटा-२०१७/प्र.क्र.३७४/फ-९ दिनांक ०७.१०.२०१७

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष १/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.६५/२३५८/२०१७-१८, दिनांक १५.०३.२०१८.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) अधिनियम १९६९ मधील तरतुदीनुसार सन १९७७-७८ पासून आपटा पानांच्या घटकांची विक्री व खरेदीची एकमुक्त पध्दती प्रमाणे करण्यात येत होती. तथापि, सन २०१६ पासून (बिगर अनुसूचित क्षेत्रातील) ई-निविदा पध्दतीने सदरची लिलाव प्रक्रिया अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेमार्फत ही प्रक्रिया राबविली जात आहे. सदर प्रक्रियेमध्ये मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांना केंद्र अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. ठाणे वनवृत्ताअंतर्गत ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर व धुळे या वनवृत्ताचे ३१ घटक असून, सदर घटकांच्या विक्री करीता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेमार्फत ई-निविदा पध्दतीने लिलाव करणेत येतात.

सन २०१७-१८ पासून शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन (आपटा) (२४०६ ०४६१) ही योजना योजनेत्तर मधुन योजनांतर्गत वर्ग करण्यात आलेली आहे. या योजनेकरिता रुपये २.०० लक्ष नियतव्यय मंजुर व अर्थसंकल्पित आहे.

सदर योजनेमधून आपटा पानांच्या विक्री / खरेदी बाबत ई-निविदा पध्दतीने लिलाव करणेकरीता वृत्तपत्रात जाहिरात देणेकरिता रू.०.२५ लक्ष इतका निधी संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. संदर्भ क्र.३ अन्वये शिल्लक नियतव्ययाच्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे वनवृत्ताकडून प्राप्त झालेला रोहा वनविभागातील मुरुड वनक्षेत्रातील, मांडला, कोर्लई, काशिद, मजगांव या संयुक्त वनव्यवस्थापन मार्फत आपटा बीज भांडवल कामाचा रु.१.७५ लक्षचा नविन/चालू बाब प्रस्ताव विवरणपत्रासह अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व

विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सादर करुन निधी वितरीत करण्यास शिफारसीसह विनंती केली आहे.

वित्त विभागाच्या दि.०६.०२.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये ८०% च्या मर्यादेत रु.१.१५ लक्ष वितरीत करता येइल. त्यानुसार रोहा वनविभागातील मुरुड वनक्षेत्रातील, मांडला, कोर्लई, काशिद, मजगांव या संयुक्त वनव्यवस्थापन मार्फत आपटा बीज भांडवल कामासाठी रु.१.१५ लक्ष निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णयः-</u>

वार्षिक योजना सन २०१७-१८ राज्य योजनेअंतर्गत रोहा वनविभागातील मुरुड वनक्षेत्रातील, मांडला, कोर्लई, काशिद, मजगांव या संयुक्त वनव्यवस्थापन मार्फत आपटा बीज भांडवल कामासाठी रु.१.१५ लक्ष इतका निधी (४४०६ ०४६१) या लेखाशिर्षा अंतर्गत विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर निधी खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.
२. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अनुसार नियम पुस्तिकेच्या परिच्छेद ४०१ मध्ये नमुद केल्यानुसार निविदा प्रक्रियेत खरेदी किंमत रुपये तीन लाख व त्यापेक्षा अधिक असल्यास ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.
३. प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी विहीत पध्दतीचे पालन करावे व आवश्यकतेनुसार आहरण करावे.
४. उपरोक्त खर्च विहीत कार्यपध्दतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.
५. प्रस्तावित सर्व कामांना सक्षम प्राधिकारी यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी आहे यांची खात्री करुनच कामे करावीत. तसेच सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८०, भारतीय वन अधिनियम, १९२७, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ मधील तरतुदींचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.
६. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपूरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.
७. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ३०.०६.२०१७ व दिनांक ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.
८. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी- २०११/प्र.क्र. १७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्र.सी-७, प्रधान शिर्ष- २४०६, वनिकरण व वन्यजीवन, (०१) (०२) शासकिय अभिकरणाकडून समुपयोजन (आपटा) (२४०६ ०४६१) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करीता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०६.०२.२०१८ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२११७०८०२२४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2018.03.21 17:10:27 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे
५. उप वनसंरक्षक, रोहा.
६. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
७. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
८. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)